I

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग

राजीव गांधी भवन (मुख्यालय), शरणपुररोडनाशिक -४२२ ००२

---

**कालिकामाता यात्रा उत्सव २०२६ निमित्त मनपा मालकीची जागा वाटप जाहिर लिलाव नोटीस.**

---

सार्वजनिक नवरात्र उत्सव - २०२६ करीता,जुना आग्रारोड लगत असलेल्या नाशिकची ग्रामदैवत कालिकामातेच्या यात्राउत्सवा निमित्त दि.११/१०/२०२६ ते दि.२०/१०/२०२६ या कालावधीकरीता मुंबईनाक्याजवळील हॉटेल संदिप समोरील महानगरपालिका मालकिचा भुखंड क्रमांक १०८/अ येथील खुली जागा खेळणी,रहाटपाळणा व इतर मनोरंजनाचे साहित्य स्वखर्चाने लावणे व व्यवसाय करणे इ.कामी तात्पुरता स्वरुपात देणे बाबत,सदर जागेची जाहिर लिलाव प्रक्रीया सोमवार दि.२८/०९/२०२६ रोजी स.१०.३० वाजता विभागीय अधिकारी (पश्चिम) यांचे नियंत्रणात, मनपाचे विभागीय कार्यालय,पश्चिम नविन पंडीत कॉलनी येथील पहिल्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे तरी इच्छुकांनी वेळेवर उपस्थित रहावे.

---

**सविस्तर अटी – शर्ती**

१. लिलावात भाग घेणाऱ्यास खालीलप्रमाणे छायांकित प्रती (साक्षांकीत करुन) २ प्रतीत सादर करावी लागेल.त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
अ) आधारकार्ड ब) पॅनकार्ड क) मागिल वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न. ड) जी.एस.टी प्रमाणपत्र
सदर लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष फक्त) लिलावाच्या दिवशी व लिलाव वेळेपुर्वी भरावी लागेल.त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. सदर दिवशी व वेळेत जितके इच्छुक व्यावसायिक लिलावात रितसर सहभागी होतील तेवढयांना लिलावात सहभागी करून लिलावाची कार्यवाही सुरु करून पुर्ण करण्यात येईल.

३. यशस्वी लिलाव धारकांस प्राप्त जागेची अंतिम लिलाव बोलीप्रमाणे निश्चित केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील शासनाचा वस्तु व सेवाकराची १८% इ.लिलाव प्रक्रीया संपुष्टात आल्यानंतर,त्याच दिवशी अथवा लगतच्या दिवशी रोखीने अथवा डिमांड ड्राफने (नांवे नाशिक महानगरपालिका, नाशिक) भरना करणे बंधनकारक आहे.दिलेल्या मुदतीत जागा लायसेंस फी व इतर कराचा भरणा न केल्यास जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर जागा इतर इच्छुकांना वाटप करण्यात येईल.

४. लिलावप्रक्रीयेतील बोली बोलतांना किमान रु.५०००/- च्या पटीत घोषीत करणे अनिवार्य आहे,तसेच तृतीय बोलीत लिलाव कायम करण्यात येतील.

५. लिलावधारकास मा. पोलिस आयुक्त, नाशिक यांचेकडून सदर जागा वापरणे पूर्वी आवश्यक ती लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहिल.त्याशिवाय सदर जागा वापरणेची परवानगी यशस्वी लिलावधारकास मिळणार नाही.

६. यशस्वी लिलावधारकास पाळणे / खेळणी व इतर मनोजरंजनाची साधने उभारणी करण्यापुर्वी सार्व - बांधकाम विभाग, यांचे स्ट्रक्चर स्टॅबीलीटी सर्टिफिकेट तसेच विदयुत निरीक्षक महाराष्ट्र शासन,मुख्य अग्निशमन अधिकारी नाशिक मनपा इ. विभागाचा ना-हरकत दाखला तसेच सदर साधनांकरीता आवश्यक असणा-या इतर अनुषंगिक परवानग्या स्वखर्चाने प्राप्त करने बंधनकारक आहे. व सर्व उपकरणे सुरक्षित व तांत्रिक दृष्टीने योग्य असल्याचे प्रमाणपत्र यशस्वी लिलावधारकाने सादर करणे आवश्यक आहे.

७. जागा वापरणेची मुदत दिनांक ११/१०/२०२६ ते दिनांक २२/१०/२०२६ अखेर पावेतो अशी असली तरी खेळणी, पाळणे व इतर मनोरंजनाचे साहित्य उभारणे व काढणेकामी सदर तारखांचे सुरुवातीचे ४ व नंतरचे ३ दिवस सदर जागा वापरणेस मुभा असेल.परवानगी दिलेल्या कालावधी संपल्यानंतर त्वरित पाळणा / झोपाळा काढून टाकणे बंधनकारक आहे.विहित मुदतीत जागेचा ताबा न सोडल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

८. महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल बंदी नियमाचे पालन करावे लागेल.

९. यशस्वी लिलावधारकाने जागे बाबत भरणा केलेली सुरक्षा अनामत मुदत संपल्यानंतर,जागा पुर्ववत स्वच्छ व जैसे थे करुन देणे बंधनकारक आहे.तद्नंतर अनामत रक्कम प्राप्त करणेकरीता मागणी अर्ज,सदर जागा रिकामी केल्यानंतरचा जीपीएस फोटो, अनामत रक्कमेची मुळ पावती तसेच मनपाचे इतर

थकबाकी नसलेबाबतचा दाखला सादर केल्यानंतर,अनामत रक्कम अदायगी करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

१०. महानगरपालिकेचे इतर चार्जेस वेगळे भरावे लागेल. सदर ठिकाणी लागणारा विजपुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडुन स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्यावा.

११. सदर आकाश पाळणा, इलेक्ट्रिक चक्र व मनोरंजनासाठी येणारे भाविकांची/नागरिकांची तसेच त्या ठिकाणील इतर साहित्य / सामानाची सुरक्षिततेची आवश्यक ती उपाययोजना यशस्वी लिलावधारकास करावी लागेल. यात काही नुकसान झाल्यास / चोरी झाल्यास/काही दुर्घटना/ अपघात घडल्यास त्यास नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील.

१२. मक्तेदाराने रहाटपाळणा, खेळणी व इतर मनोरंजनाची साधने स्वतःच्या खर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर उभारावीत. त्यासाठी महानगरपालिकेकडून कोणतीही आर्थिक जबाबदारी राहणार नाही.

१३. रहाटपाळणा/झोके/इतर यांत्रिक मनोरंजन साधने उभारण्यापूर्वी त्यांची नोंदणीकृत/सक्षम तांत्रिक अभियंता किंवा शासनमान्य तांत्रिक संस्थेकडून संरचनात्मक व सुरक्षितता तपासणी करून घेणे बंधनकारक राहील.

१४. रहाटपाळणा किंवा इतर मनोरंजन साधनामुळे कोणतीही दुर्घटना, दुखापत, जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान किंवा तृतीय पक्षाचा दावा झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील. त्याबाबत महानगरपालिकेवर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१५. रहाटपाळणा व इतर साधनांची निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश देऊ नये. प्रत्येक खेळणी/राइडची कमाल प्रवासी क्षमता स्पष्टपणे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

१६. लहान मुले, गर्भवती महिला, आजारी व्यक्ती किंवा संबंधित राइडसाठी वैद्यकीय/वयोमर्यादा असलेल्या व्यक्तींना त्या राइडवर प्रवेश देऊ नये. आवश्यक त्या सूचना मराठी भाषेत स्पष्टपणे प्रदर्शित कराव्यात.

१७. प्रत्येक राइडवर प्रशिक्षित व जबाबदार ऑपरेटर नियुक्त करणे बंधनकारक राहील. ऑपरेटरशिवाय कोणतीही राइड चालविता कामा नये.

१८. कोणत्याही प्रकारे नैसर्गिक, अनैसर्गिक कारणाने अगर इतर अन्य कोणत्याही कारणाने लिलावधारकाचे काही नुकसान झाल्यास त्यास नाशिक महानगरपालिका कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस जबाबदार राहणार नाही.

१९. मनोरंजनासाठी येणारे भाविकांची/नागरिकांची सुरक्षिततेबद्दल यशस्वी लिलावधारक आवश्यक ती व्यवस्था करील व त्यासंबंधात ते पूर्णतः जबाबदार राहतील.

२०. सदर ठिकाणी काही अपघात वगैरे होऊन यशस्वी लिलावधारकचे/ कर्मचारी / पर्यटक /भाविक /नागरिक या इतर व्यक्ती यांची जिवीत / वित्त हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील.

२१. मनोरंजनासाठी येणारे भाविकांची/नागरिकांची सुरक्षिततेसंबंधी कायदेशीर प्रश्न व इतर बाधा निर्माण झाली व त्यांना काही भरपाई दाखल रक्कम देणे आवश्यक झाले तर त्या संबंधात सर्व जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील. व त्या संबंधातील सर्व खर्च यशस्वी लिलावधारक देईल.

२२. जागेची कोणत्याही त-हेने हस्तांतर, पोटभाडेकरु, बक्षिस, गहाण, असाईनमेंटवगैरे करता येणार नाही. अगर गुडविलने जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाही. तसेच जागा संपूर्णपणे अशंतः दुस-याच्या नावावर करून देता येणार नाही. तसेच जागेत भागिदार घेता येणार नाही.

२३. महाराष्ट्र शासन,मा.जिल्हाधिकारी, नाशिक तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक यांचे तसेच पोलिस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडील वेळोवेळी पारित होणारे आदेशांचे सुचनेचे व अटीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

२४. सदर ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपायोजना स्वतःकरणे अनिवार्य आहे.

२५. जागेची कोणत्याही प्रकारे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई आपणास भरुन द्यावी लागेल. नुकसान भरपाई ठरविण्याचा अधिकार नाशिक महानगरपालिकेचा राहील व सदर जागेत कोणत्याही प्रकारचे पक्के स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

२६. सदर जागा वापरतांना तुमचे कडून काही गैरकृत्य झाल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास सदरची जागा २४ तासाच्या सुचनेने विनाहरकत रिकामी करुन महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावी लागेल.

२७. ध्वनीप्रदुषणामुळे आजुबाजूच्या नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

२८. दिलेल्या जागेचा परिसर स्वच्छ ठेवावा लागेल. जो कचरा/निर्माल्य जमा होईल तो घंटागाडीत टाकणे बंधनकारक आहे.

२९. यशस्वी लिलावधारकाने, प्राप्त केलेल्या जागेत व्यवसाय न केल्यास, भरणा केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील वस्तु व सेवा कर इ.लिलावधारकास परत अदा केली जाणार नाही.

३०. वरील अटींचे उल्लंघन झाल्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल तसेच आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर लिलाव मान्य करणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे / जागेचा लिलाव तहकुब करणे,नविन अटी - शर्तींचा समावेश करणे इ.अधिकार मा.आयुक्त नाशिक महानगरपालिका,नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.नाशिक मनपाने निश्चित केलेल्या उक्त नमुद अटी-शर्तीचे पालन करणे लिलावात भाग घेणारे यशस्वी लिलावधारकांवर बंधनकारक आहे.

उपआयुक्त(जापवि)
नाशिक महानगरपालिका,नाशिक